# सीता-हरण

श्रीरामाच्या पादुका घेऊन भरत अयोध्येला परत गेला. त्याने पादुका सिंहासनावर ठेऊन रामाच्या नावाने राज्य करायला सुरुवात केली. असाच काही काळ गेला. नंतर श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांनी चित्रकूट सोडून दक्षिण दिशेला जायचे ठरवले. वाटेत घनदाट अरण्य होते. अरण्यात अनेक ऋषींचे आश्रम होते. त्यात ऋषी आणि त्यांचे शिष्य तपश्चर्या करीत असत. परंतु अरण्यात अनेक क्रूर राक्षसही होते. ते राक्षस ऋषींना त्रास देत असत. श्रीराम आणि लक्ष्मण यांनी त्या राक्षसांचा पराभव करून ऋषींना संरक्षण दिले.

प्रवास करत करत ते गोदावरी नदीच्या काठावर येऊन पोहोचले. तिथे पंचवटी नावाचा अतिशय रम्य परिसर होता. तिथे अनेक प्रकारचे वृक्ष, वेली होत्या. अनेक फुले होती. त्यांचे सौंदर्य पाहून राम, लक्ष्मण आणि सीता हरखून गेले. पंचवटीच्या परिसरात एक सुरेख कुटी बांधून ते तिघे आनंदाने राहू लागले.

त्या परिसरात खर नावाचा राक्षस होता. त्याची बहीण होती शूर्पणखा. तिने रामाला पाहिले. तिला तो खूप आवडला. तिला वाटले रामाने आपल्याशी लग्न करावे. परंतु रामाने तिला सांगितले की त्याचे सीतेशी लग्न झाले आहे. तेव्हा शूर्पणखा सीतेला मारायला निघाली. हे पाहून रामाने लक्ष्मणाला आज्ञा केली, “या शूर्पणखेला शिक्षा कर.” लक्ष्मणाने तिचे नाक कापून टाकले.

नाक कापलेली शूर्पणखा रडत खर राक्षसाकडे गेली. आपल्या बहिणीची अशी अवस्था बघून खर संतापला. त्याने चौदा हजार राक्षसांचे सैन्य घेऊन पंचवटीवर हल्ला केला. परंतु राम आणि लक्ष्मण यांनी त्यांचा सहज पराभव केला. खर राक्षसाचा वध केला.

आता शूर्पणखा रडत लंकेला गेली. लंकेचा राजा होता रावण. खर आणि शूर्पणखा यांची अवस्था पाहून रावण संतापला. परंतु रामाचा पराक्रम त्याला आता समजला होता. त्यामुळे त्याने कपट करायचे ठरविले.

रावणाने मारिच राक्षसाला कांचन-मृगाचे रूप घेऊन पंचवटीच्या जवळ पाठवले. सीतेने त्या सुंदर कांचन-मृगाला पाहिले. तिला तो हरिण खूप आवडला. तिने रामाजवळ मागणी केली, “मला हा हरिण आणून द्या.” श्रीरामाने लक्ष्मणाला सीतेचे रक्षण करायला सांगितले. तो स्वतः धनुष्य घेऊन कांचन-मृगाच्या मागे गेला.

रामाला येताना पाहून कांचन-मृग धावत धावत दूर गेला. त्याच्या मागे रामही पंचवटीपासून खूप दूर गेला. अखेर रामाने हरिणाला बाण मारला. तो बाण लागून मरत असताना मारीच रामाच्या आवाजात ओरडला, “धाव लक्ष्मणा, धाव!”

Unrestricted

श्रीरामाच्या आवाजातली ही हाक ऐकून सीता घाबरली. तिने लक्ष्मणाला रामाच्या मदतीसाठी जायला सांगितले. नाईलाजानेच लक्ष्मण जाण्यास तयार झाला. परंतु त्याने झोपडीबाहेर एक रेष काढली. तो सीतेला म्हणाला की त्या रेषेच्या बाहेर जाऊ नकोस. इतके बोलून तो रामाच्या आवाजाच्या दिशेनी निघाला.

लक्ष्मण तिथून जाताच लपून बसलेला रावण यती-वेशात तिथे आला. त्याने सीतेला भिक्षा मागितली. सीता त्याला देण्यासाठी फळे घेऊन आली. परंतु रावण लक्ष्मण-रेषेच्या आत येऊ शकत नव्हता. त्याने सीतेला बाहेर यायला सांगितले. भिक्षा देण्यासाठी सीतेने बाहेर पाउल ठेवले. तितक्यात रावणाने यती-वेश सोडून आपले खरे रूप प्रकट केले. त्याने सीतेला उचलून आपल्या रथात ठेवले. त्याचा रथ आकाशात उडून लंकेकडे जाउ लागला.



1. धड्यातील पाच जोड-वाक्ये शोधा. त्यांची दोन वाक्ये करून लिहा:

उदा: श्रीरामाच्या पादुका घेऊन भरत अयोध्येला परत गेला. = श्रीरामाच्या पादुका घेतल्या. भरत अयोध्येला परत गेला.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

2. तुम्ही पाच जोड-वाक्ये तयार करून लिहा. वाक्ये जोडणाऱ्या शब्दाखाली रेघ मारा:

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

शिक्षकांसाठी:

1. खालील विषयांवर वर्गात चर्चा करणे:
    - दिशा – पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण
    - "लक्ष्मण रेषा" याचा अर्थ काय?
2. भारताच्या नकाशात रामाचा मार्ग दाखवा: अयोध्या – मिथिला – अयोध्या – चित्रकूट - पंचवटी. त्यावर सरयू, गंगा आणि गोदावरी या नद्या दाखवा.